ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करणेबाबत.(श्री. स्वप्नील सखाराम आंबेटकर, सेवानिलंबीत तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत चोंभूत तालुका पारनेर)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/ई.क्र ९८३८२२३
दिनांक - १४/०७/२०२५

संदर्भ :- १ या कार्यालयाकडील सेवा निलंबन आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/७१५/२०२२, दिनांक ०१/११/२०२२

२. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र / ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/७१७/२०२२, दिनांक-०१/११/२०२२

३. कार्यालयाचा शिक्षा अंतिम केलेचा आदेश ग्रांप३/ई.क्र १०५०८८०/२०२५ दिनांक २४/०३/२०२५

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ३ (१)

५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ३ (५)

६. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. निप्रआ-११२२/प्र.क्र.०९/विचौ-२ दिनांक- २२ एप्रिल २०२५

संदर्भ क्रमांक ०१ चे आदेशान्वये श्री. स्वप्नील सखाराम आंबेटकर, सेवानिलंबीत तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत चोंभूत पंचायत समिती पारनेर यांना ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन व धनादेशात खाडाखेड केल्याने जिल्हा परिषद सेवेतुन सेवानिलंबित करणेत आलेले होते.

संदर्भ क्रमांक ०२ चे ज्ञापनान्वये श्री.स्वप्नील सखाराम आंबेटकर, सेवानिलंबीत तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत चोंभूत पंचायत समिती पारनेर यांचे गैरवर्तना बाबत एकुण ०७ आरोप ठेवून शिस्तभंगाची कार्यवाही करणे कामी दोषारोप बजावण्यात आलेले होते.

संदर्भ क्रमांक ०३ अन्वये या गैरवर्तन दोषारोप प्रकरणी श्री.आबेंटकर यांना मुळ पदाचे निम्न सेवेत,श्रेणीत ,पदावर आणणे हि शिक्षा अंतिम करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्रमांक ०६ चे शासन निर्णयानुसार श्री.स्वप्नील सखाराम आंबेटकर , सेवा निलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांचा सेवा निलंबन कालावधी तीन महिन्यापेक्षा अधिक झालेला असल्याने, त्यांची विभागीय चौकशी पुर्ण होऊन गैरवर्तनाबाबत शिक्षा अंतिम करण्यात आलेली असल्याने. त्यांचे सेवानिलंबन प्रकरणाचा आढावा घेण्यात आलेला असुन सदर कर्मचा-यास अधिक काळ सेवानिलंबन ठेवणे उचित होणार नसल्याने या सेवानिलंबन प्रकरणी श्री.स्वप्नील सखाराम आंबेटकर यांचे सेवानिलंबन या पुढे चालू न ठेवण्याचा व जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

सबब महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे पोट नियम ३(५) नुसार, प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर तथा सक्षम प्राधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशान्वये.(श्री. स्वप्नील सखाराम आंबेटकर, सेवानिलंबीत तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत चोंभूत तालुका पारनेर) यांना ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेत पंचायत समिती जामखेड येथे पुन:स्थापित करीत आहे.

श्री.स्वप्नील सखाराम आंबेटकर सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी पंचायत समिती पारनेर यांचा या सेवा निलंबन प्रकरणी कालावधीचा निर्णय घेण्याचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमीत करण्यात येतील.

या आदेशाची नोंद श्री.स्वप्नील सखाराम आंबेटकर सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी समिती पारनेर यांचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 202507140600८9 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 14-07-2025 19:24:28
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.स्वप्नील सखाराम आंबेटकर सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी पंचायत समिती पारनेर
सेवा निलंबलन कालावधीतील मुख्यालय पंचायत समिती पाथर्डी

व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी

२/-सोबतचा आदेश संबधीतास बजावून तो मिळालेबाबतची पोहच कार्यालयास अहवाल सादर करावी

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड

२/- श्री.स्वप्नील सखाराम आंबेटकर सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी हे हजर झालेनंतर त्या बाबतचा अहवाल इकडेस सादर करावा.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.